Teachingninja.in

Latest Govt Job updates

Private Job updates

Free Mock tests available

Visit - teachingninja.in

# Maha TET

## Previous Year Paper

### Paper-I 21 Nov, 2021

Teachingninja.in

| परीक्षा सांकेतांक १०२१ | माध्यम : मराठी | प्रश्नपत्रिका क्रमांक |
| --- | --- | --- |
| पेपर सांकेतांक १०१ | | 54103912 |

वेळ : १०:३० ते १:००

बैठक क्रमांक

संच **D**

| एकूण गुण : | १५० |
| --- | --- |
| एकूण पृष्ठ : | ३२ |

## पेपर I (इ. १ ली ते इ. ५ वी)

प्रश्नप

**सूचना :-**

१. परीक्षार्थीने आपला बैठक क्रमांक त्यांना पुरविलेल्या प्रश्नपत्रिकेवर विहित ठिकाणी नोंदवावा.

२. प्रश्नपत्रिकेमध्ये सलग एकूण १५० प्रश्न असून ते सोडविण्यासाठी उमेदवारास १५० मिनिटे (अडीच तास) वेळ देण्यात आलेला आहे. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

३. प्रत्येक प्रश्न वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असून प्रश्नाच्या खाली उत्तराचे चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी उत्तराचा एकच पर्याय अचूक असून तो नोंदवावा. उत्तरे नोंदविण्यासाठी काळ्या किंवा निळ्या बॉलपेनचाच वापर करावा. अचूक उत्तर असलेल्या पर्याय क्रमांकाचा गोल पूर्णपणे रंगवावा. अर्धवट रंगवलेले गोल, खाडाखोड अथवा एकाच प्रश्नासाठी दोन उत्तरे दर्शविलेली असतील अशा उत्तरांना गुण दिले जाणार नाहीत. एकदा दिलेले उत्तर बदलता येणार नाही.

४. कोणत्याही कारणामुळे प्रश्न रद्द करावा लागल्यास अचूक प्रश्नांच्या गुणांवर आधारीत पात्रता निश्चित करण्यात येईल.

५. प्रश्नपत्रिकेत कोणत्याही प्रश्नांच्या उत्तराची नोंद करु नये. प्रश्नपत्रिकेचे कोणतेही पृष्ठ/भाग मूळ प्रश्नपत्रिकेपासून वेगळा करू नये.

६. कच्चे काम प्रश्नपत्रिकेमध्ये दर्शविण्यात आलेल्या जागेतच करण्यात यावे.

७. उत्तरपत्रिकेचा क्रमांक, प्रश्नपत्रिका संच कोड स्वाक्षरीपटावर लिहिणे आवश्यक आहे.

८. परीक्षा प्रवेशपत्राची मागणी केल्यास समवेक्षक/पर्यवेक्षकांना दाखवावे.

९. प्रश्नपत्रिकेमध्ये खालीलप्रमाणे विषयनिहाय विभाग आहेत.

| विभाग | विषय | प्रश्न क्रमांक | गुण |
| --- | --- | --- | --- |
| १ | मराठी | १ ते ३० | ३० |
| २ | इंग्रजी | ३१ ते ६० | ३० |
| ३ | बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र | ६१ ते ९० | ३० |
| ४ | गणित | ९१ ते १२० | ३० |
| ५ | परिसर अभ्यास | १२१ ते १५० | ३० |

१०. उत्तरपत्रिका समवेक्षकाकडे जमा करताना उत्तरपत्रिकेची Carbonless प्रत (उत्तरपत्रिकेचा भाग २) परीक्षार्थी ने स्वत:कडे ठेवून ती मिळाल्याबाबतची स्वाक्षरी स्वाक्षरीपटावर नोंदवावी.

११. परीक्षा संपल्यानंतर समवेक्षकाच्या सूचनेशिवाय परीक्षागृह सोडू नये.

१२. परीक्षार्थीने परीक्षा चालू असताना अथवा परीक्षा संपल्यानंतर परीक्षेसंबंधी कोणतेही साहित्य, कागद वगैरे परीक्षागृहाबाहेर नेल्यास त्याची या परीक्षेतील उमेदवारी रद्द होईल.

१३. परीक्षागृहात मोबाईल, स्मार्ट वॉच, कॅलक्युलेटर, लॉगटेबल, रेडी रेकनर इत्यादी साहित्य आणू नये.

१४. परीक्षेसाठी विहित केलेली वेळ संपल्यानंतर परीक्षार्थीस ही प्रश्नपत्रिका स्वत: बरोबर परीक्षा कक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. परीक्षेची वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपत्रिकेची प्रत/प्रती किंवा प्रश्नपत्रिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षामध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-८२" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

१५. परीक्षार्थींनी पेपरची विहित वेळ सुरु झाल्यानंतरच या प्रश्नपत्रिकेस लावलेले कागदी सील काढावे. पेपर सुरु होण्याच्या विहित वेळेपूर्वी सील काढू नये.

Teachingninja.in

# मराठी

**पुढील कविता वाचून त्याखालील प्रश्न क्र. 001 ते 004 ची उत्तरे दिलेल्या पर्यायातून निवडा.**

कोपऱ्यासी गुणगुणत अन् अभंग
उभा केव्हाचा एक तो अपंग
भोवतीचा अंधार तो निमाला
हृदयी त्याच्या जणू जात आश्रयाला ।।

जीभ झालेली ओरडून शोष
चार दिवसांचा त्यातही उपास
नयन थिजले थरथरती हातपाय
रूप दैन्याचे उभे मूर्त काय?।।

कीव यावी पण त्याची कुणाला
जात उपहासुनि पसरला कराला
तोच येई कुणी परतुनी मजूर
बघुनि दीना त्या उधाणून ऊर।।

म्हणे राहिन दिन एक मी उपाशी
परी लाभू दे दोन घास यासी
खिसा ओतुनि तया ओंजळीत
चालू लागे तो दीनबंधू वाट

**001.** या कवितेत कोणाचे वर्णन केले आहे?
(1) भाविकाचे (2) आजाऱ्याचे (3) अपंगाचे (4) मूर्तीचे

**002.** त्याचे हातपाय का थरथरत होते?
(1) आजारामुळे (2) उपासामुळे (3) दमल्यामुळे (4) भीक मागितल्याने

**003.** 'दीनबंधू' कोणास म्हटले आहे?
(1) भिकाऱ्यास (2) धनिकास (3) मजुरास (4) ईश्वरास

**004.** भिकाऱ्यास बघून मजुराने काय केले?
(1) त्याचा ऊर भरून आला.
(2) भिकाऱ्याच्या ओंजळीत खिशातील सर्व पैसे टाकले.
(3) आपले अन्न त्यास दिले.
(4) त्याने त्यास शिव्या दिल्या.

**005.** 'केशवसुत' या टोपणनावाने लेखन करणाऱ्या साहित्यिकाचे नाव काय?
(1) प्र. के. अत्रे (2) कृ. के. दामले
(3) रा. ग. गडकरी (4) वि. वा. शिरवाडकर

Teachingninja.in

**006.** पुढील वाक्यात कोणते विरामचिन्ह असायला हवे?
ताई म्हणाली, आज अजिंक्य किती छान बोलला!
(1) ? (2) . (3) ; (4) " "

**007.** धाकट्या भावाला राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे पहिले पारितोषिक मिळाले, त्याला लिहिलेले पत्र कोणत्या प्रकारचे असेल?
(1) चौकशी पत्र (2) अभिनंदन पत्र (3) तक्रार पत्र (4) मागणीपत्र

**008.** 'कोणत्याही प्रश्नाचे लगेच उत्तर देणारा' या शब्दसमूहासाठी योग्य शब्द लिहा.
(1) हजरजबाबी (2) वाचाळ (3) तोंडाळ (4) शब्दप्रभू

**009.** लेखक भालचंद्र नेमाडे यांना 'ज्ञानपीठ' हा पुरस्कार केव्हा प्राप्त झाला?
(1) 6 फेब्रुवारी 2015 (2) 6 मार्च 2015
(3) 6 जानेवारी 2015 (4) 6 एप्रिल 2015

**010.** पंजाबातील घुमान येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कोण?
(1) फ. मुं. शिंदे (2) नागनाथ कोत्तापल्ले
(3) डॉ. सदानंद मोरे (4) मंगेश पाडगावकर

**011.** 'सभा' या शब्दाचे लिंग कोणते?
(1) स्त्रीलिंग (2) पुल्लिंग (3) नपुंसकलिंग (4) उभयलिंग

**012.** '<u>तुम्ही स्वत:ला</u> काय समजता?' यातील अधोरेखित सर्वनामाचा प्रकार कोणता?
(1) पुरुषवाचक व आत्मवाचक (2) दर्शक व पुरुषवाचक
(3) प्रश्नार्थक व आत्मवाचक (4) संबंधी व सामान्य सर्वनाम

**पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्न क्र. 013 ते 016 ची उत्तरे दिलेल्या पर्यायातून निवडा.**

महात्मा जोतिबा फुले म्हणतात, ज्याचे मन सत्याने पवित्र झाले आहे, तो जगातील सर्वात पवित्र माणूस. ज्या मनुष्याला मनाच्या पावित्र्याचे महत्त्व कळत नाही. तो मनुष्य धरणीस भार ठरतो. निर्दोष आणि उद्योगी जीवन मनुष्याला आरोग्य नि संपत्ती देते. आळशी मनुष्य हा दुष्ट असतो. तो समाजाचा शत्रू बनतो. तो कधीही सुखी होत नाही. उद्योगी आणि शुद्ध चारित्र्याचा मनुष्य हा गरिबांचा वाली असतो. तो अनेकांना सुखी करतो. सत्यप्रेमी, निर्मळ मन आणि शांत हृदय यातून धैर्य निर्माण होते. धैर्यशील मनुष्य हालअपेष्टा सहन करतो, आणि संकटावर मात करतो.

**013.** जोतिबांच्या मते, जगातील सर्वात पवित्र माणूस कोणता?
(1) जो मनाने निर्मळ असतो. (2) ज्याचे मन सत्याने पवित्र झालेले असते.
(3) जो सर्वांना आवडतो. (4) ज्याचे मन सत्यप्रेमी असते.

**014.** मनुष्याला आरोग्य व संपत्ती कशामुळे मिळते?
(1) निर्दोष व उद्योगी जीवनामुळे. (2) निर्दोष व समाधानी जीवनामुळे.
(3) व्यायाम व व्यवसाय केल्याने. (4) दुसऱ्याला व्यवसायात मदत केल्याने.



Teachingninja.in

**015.** आळशी मनुष्य कसा असतो?
(1) तो समाधानी असतो.
(2) तो समाजाचा नायक असतो.
(3) तो दुष्ट व समाजाचा शत्रू असतो.
(4) तो आपला वेळ चैनीत घालवतो.

**016.** धैर्यशील माणूस कसा ओळखावा?
(1) जो दुसऱ्यांनाच फक्त धीर देतो.
(2) तो धैर्यशील असल्याने लोकांना धैर्याचे महत्त्व पटवून देतो.
(3) तो सत्यप्रेमी, निर्मळ व शांत मनाचा असतो.
(4) जो सत्यप्रेमी असून स्वत:च्या धैर्यशीलतेचा समाजात प्रचार करतो.

**017.** 'टवटवीत' शब्दाचा अचूक विरुद्धार्थी शब्द कोणता?
(1) सतेज (2) मलूल (3) नि:संदेह (4) कोरडे

**018.** आता थोड्याच वेळात कार्यक्रमाला सुरु करुया.
या वाक्यातील चूक ओळखून दुरुस्ती सुचवा.
(1) सुरु करुया – सुरु करु या.
(2) कार्यक्रमाला – कार्यक्रम
(3) वेळात – वेळेत
(4) वाक्यात कोणतीही चूक नाही.

**019.** 'साखरवाडी' या शब्दात खालीलपैकी कोणता शब्द नाही.
(1) साखर (2) सार (3) वडी (4) साडी

**020.** 'धूम ठोकणे' या वाक्प्रचाराचा योग्य अर्थ कोणता?
(1) वेगाने धावणे (2) खूप मार देणे (3) कपडे धुणे (4) धो धो वाहणे

**021.** पुढीलपैकी कोणती रुपे 'र' ची नाहीत?
(1) सर्व (2) सम्राट (3) राष्ट्र (4) यापैकी नाही

**022.** पुढीलपैकी अचूक शब्द कोणता?
(1) पुनर्वसन (2) पुर्नवसन (3) पुनवर्सन (4) पुन:वसन

**023.** पुढीलपैकी कोणत्या गटातील शब्द 'क्रियाविशेषण' या शब्दजातीतील आहेत?
(1) अरेरे, शाब्बास (2) परंतु, म्हणून (3) आता, इकडे (4) करिता, साठी

**024.** पुढीलपैकी धातुसाधित विशेषणे कोणती?
(1) फळ-भाजी (2) वाहती नदी (3) थोडी पुस्तके (4) कोणता गाव

Teachingninja.in

**025.** पुढीलपैकी कोणत्या वाक्यातील क्रियापद सकर्मक आहे?
(1) गवळी धार काढतो.
(2) आंबा नासका निघाला.
(3) मला घरी यावयास रात्र झाली.
(4) सुनील उद्या पुण्याला जाईल.

**026.** मराठीतील आद्य गद्य ग्रंथ कोणता?
(1) विवेकसिंधु
(2) लीला-चरित्र
(3) ज्ञानेश्वरी
(4) यापैकी नाही

**027.** पुढीलपैकी पूर्ण वर्तमानकाळाचे वाक्य कोणते?
(1) मधूने लाडू खाल्ला असेल.
(2) मधूने लाडू खाल्ला होता.
(3) मधू लाडू खातो.
(4) मधूने लाडू खाल्ला आहे.

**028.** भुजंगप्रयात वृत्तातील गण कोणते?
(1) त, त, ज, ग, ग
(2) य, य, य, य
(3) त, भ, ज, ज, ग, ग
(4) न, न, म, य, य

**029.** संत म्हणति 'सप्त पदे सहवासे सख्य साधुशी घडते'। या ओळीतील अलंकार कोणता?
(1) यमक
(2) अनुप्रास
(3) उपमा
(4) उत्प्रेक्षा

**030.** पुढीलपैकी ओष्ठ्य वर्ण कोणता?
(1) भ्
(2) ल्
(3) श्
(4) ह

Teachingninja.in

**031.** Choose the correct alternative.
I : This tree is older than that.
II : He is my elder brother.
(1) Only I is correct
(2) Both I and II are correct
(3) Only II is correct
(4) Both I and II are incorrect

**032.** Choose the alternative which can correctly substitute the underlined part of the sentence.
We should get to the cinema early <u>not to miss</u> the beginning of the film.
(1) for not missing
(2) in case not to miss
(3) in order not to miss
(4) No improvement

**033.** Fill in the blank with the alternative.
This is the ________ news.
(1) latter (2) latest (3) last (4) let

**034.** Choose the correct alternative.
He ran ________
(1) quick (2) as quickly (3) so quick (4) quickly

**035.** Fill in the blank with the proper alternative.
As the festival approaches the number of customers ________
(1) increases
(2) will be increased
(3) is increasing
(4) will have increased

**036.** Choose the correct alternative.
Questions will be answered by a ________ of experts.
(1) staff (2) band (3) panel (4) bunch

**037.** Find out the correct feminine noun of 'Fox'
(1) Foxen (2) She fox (3) Vixen (4) Foxess

**Read the following passage and answer the questions selecting the most appropriate alternative. (Que. Nos 038 to 042)**

In large part determined by a person's gense. In short, some people are more predisposed to be fat. Moreover someone who was obese in childhood will have more fat cells than an average person. Once made the cells may enlarge or shrink but they never disappear. Gense however don't have to control your girth. The size of your fat cells depends on you on your eating habits and life-style. There are ways to keep them small : eat low-fat fibre-rich foods such as whole grain breads, vegetables and fruits. Chew food slowly.



Teachingninja.in

**038.** What one eats is an important factor in controlling weight because -

(1) Fat is burnt faster than proteins and carbohydrates.

(2) Proteins and carbohydrates use up more calories than fats.

(3) Fatty food has very little calorie content.

(4) Digestion is affected by proteins and carbohydrates.

**039.** Body weight can be controlled best by:

(1) Doing exercises vigorously, every day.

(2) Mild, daily exercise and a proper diet.

(3) Fasting and vigorous exercise.

(4) Dieting alone.

**040.** Some ways in which obesity can be controlled are.

(1) Using the car occasionally.

(2) Use of bicycle as far as possible.

(3) Making a series of small physical efforts.

(4) Totally abandoning the use of lifts.

**041.** What can we conclude about exercise from the passage?

(1) Exercise helps only in controlling the body weight.

(2) It makes one more mercurial.

(3) It makes one more active and mentally positive.

(4) It is difficult to do exercise which is effective.

**042.** In determining whether one is going to be fat or thin.

(1) Genes play a paramount role.

(2) Adulthood alters childhood patterns drastically.

(3) Eating habits and life-style make no impact on fat cells.

(4) Fat cells formed during childhood are of crucial importance.

**043.** Choose correct wh-type question to get underlined part.

<u>Water</u> is needed to sustain life on the earth.

(1) Who is needed to sustain life on the earth?

(2) Which is needed to sustain life on the earth?

(3) Whose is needed to sustain life on the earth?

(4) What is needed to sustain life on the earth?

**044.** Choose the proper alternative to fill in the blank.

The shopkeeper does not have the toys.

I was looking __________

(1) for (2) about (3) at (4) to



Teachingninja.in

045. Rearrange the jumbled parts which are labelled P, Q, R, S to produce the correct sentence. Choose the correct sequence.

The person ________

P : because he is poor

Q : work hard and efficiently

R : cannot

S : who is poor

(1) S R P Q (2) R P S Q (3) P Q R S (4) S R Q P

046. Choose the correctly spelt word

(1) Micsllaneous (2) Miscellaneous (3) Micslleneous (4) Miscellenious

047. Choose the proper article to fill in blank.

Iron is ________ useful metal.

(1) the (2) an (3) a (4) no article

048. Choose the most suitable 'one word' for the given expression:

A person who leads a simple life devoting himself to contemplation and meditation:

(1) Altruist (2) Ascetic (3) Aesthete (4) Conservative

049. Select the correct cardinal number for the given:

A million -

(1) 100,000 (2) 10,000,000 (3) 10,000 (4) 1,000,000

050. Identify which part of the sentence has an error.

A. I was greatly astonished

B. when I came to know

C. that my friend is coming to see me

D. after a gap of about twenty years

(1) C (2) A (3) B (4) D

051. Choose the correct passive voice form of the given sentence.

Why do you waste time?

(1) Why is time being wasted by you?

(2) Why has time been wasted by you?

(3) Why is time been wasted by you?

(4) Why is time wasted by you?



Teachingninja.in

**052.** Choose the correct antonym of the given word.
Acquisitive
(1) Miserly (2) Austere (3) Frugal (4) Ardent

**053.** Fill in the blank with the correct alternative.
Duck : Duckling : : Hare : ________
(1) Cygnet (2) Todpole (3) Piglet (4) Leveret

**054.** Choose the correct alternative for the given Direct speech :
"Oh, what a lovely day!" she exclaimed.
(1) She exclaimed with pleasure that it was a lovely day.
(2) She exclaimed that what a lovely day it was
(3) She exclaimed with pleasure that it is a lovely day.
(4) All correct.

**055.** Choose the correct alternative.
He is ________ for his evil deeds.
(1) Famous (2) Celebrated (3) Notorious (4) Noted

**056.** Fill in the blank with the correct alternative.
Reading is easier ________ speaking.
(1) to (2) for (3) be (4) than

**057.** Identify the mismatched pair from the given alternative.
(1) Parrots - squeal (2) Frogs - croak
(3) Owls - hoot (4) Horses - neigh

**058.** Choose the correct alternative.
He will not come, ________
(1) I do not think (2) May think
(3) I thought (4) I think

**059.** Find out the phrase which can correctly substitute the underlined part of the sentence.
I saw him make a <u>wry face</u>
(1) Show disappointment (2) Feel sick
(3) Abuse (4) Cry with pain

**060.** Fill in the blank with the correct alternative.
The doctor ________ the patient from taking certain medicines.
(1) banned (2) prescribed (3) prohibited (4) proscribed



Teachingninja.in

## बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र

061. अध्ययन उपपत्तींच्या वर्गीकरणातील आधुनिक उपपत्तीमध्ये खालीलपैकी कोणत्या उपपत्तीचा समावेश होत नाही?

(1) प्रभुत्त्व अध्ययन उपपत्ती (2) क्षेत्रीय उपपत्ती
(3) सामाजिक अध्ययन उपपत्ती (4) माहिती प्रक्रियाकरण प्रतिमान

062. अध्ययनार्थी आदर्श शोधतो, त्याचे निरीक्षण करतो, आदर्श वर्तनाचे अनुकरण करतो आणि आपल्या वर्तन प्रबलनाची आशा करतो व अध्ययन करतो, ही वैशिष्ट्ये असणारी सामाजिक निरीक्षणात्मक उपपत्ती खालीलपैकी कोणत्या मानसशास्त्रज्ञाने मांडली?

(1) बांदूरा (2) ब्लूम (3) ब्रुनर (4) आसूबेल

063. प्रभावी अध्यापनातून विद्यार्थ्यांमध्ये अध्ययनशील वृत्तीची निर्मिती व्हावी म्हणून खालीलपैकी कोणत्या क्षमता महत्त्वाच्या आहेत?

अ) चिकित्सक वृत्ती निर्माण व्हावी.
ब) स्वतंत्र विचार करण्याची क्षमता निर्माण व्हावी.
क) नीर विवेक बुद्धि निर्माण व्हावी.
ड) समस्येची उकल करण्याची कुवत निर्माण व्हावी.

(1) अ, ब आणि क (2) अ, ब आणि ड (3) ब, क आणि ड (4) अ, ब, क, ड सर्व

064. खालीलपैकी कोणत्या प्रतिमानाचे उद्दिष्ट हे ज्ञानात्मक, वैचारिक, बौद्धिक अंगांचा विकास घडवून आणणे आणि उद्गामी व अवगामी विचार प्रक्रियेची क्षमता विकसित करणे हे आहे?

(1) ज्ञान प्रक्रियाकरण प्रतिमाने (2) व्यक्तिगत विकास प्रतिमाने
(3) सामाजिक आंतरक्रिया प्रतिमाने (4) वर्तन परिवर्तन प्रतिमाने

065. खाली दिलेल्या अध्ययन प्रक्रियेच्या वैशिष्ट्यांमध्ये कोणते वैशिष्ट्य योग्य नाही?

(1) अध्ययन हे नेमके कृतीद्वारा घडत असते.
(2) प्रत्येक प्राणी जगण्यासाठी अध्ययन करीत असतो.
(3) सर्व प्राण्यांचे अध्ययन सारखे असते.
(4) अध्ययन ही हळूहळू घडणारी प्रक्रिया आहे.

066. "अनुभवांच्या सहाय्याने व्यक्तीच्या वर्तनात हळूहळू घडून येणारे बदल म्हणजे अध्ययन होय." अशी व्याख्या खालीलपैकी कोणत्या मानसशास्त्रज्ञाने केली?

(1) फ्रँडसेन (2) मर्फी (3) वुडवर्थ (4) गिलफर्ड

067. अध्ययन करतांना पठारावस्था निर्माण होऊ नये म्हणून खालीलपैकी कोणत्या गोष्टी कराव्यात?

अ) विद्यार्थ्यांमध्ये अभिरूची निर्माण करावी.
ब) प्रेरकाची तीव्रता कमी करावी.
क) कौशल्य संपादन करतांना चुकीच्या सवयी आत्मसात करु देऊ नये.
ड) वेग आणि अचूकता यापैकी एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित करावे.

(1) अ आणि ब (2) अ आणि क (3) अ आणि ड (4) ब आणि क



Teachingninja.in

**068.** खाली अध्ययनाची व्याख्या व मानसशास्त्रज्ञ यांच्या जोड्या दिल्या आहेत. त्यांचा योग्य जोड्यांचा पर्याय कोणता?

| | अ | | ब |
|---|---|---|---|
| i) | मन | अ) | अध्ययन म्हणजे अनुभवाद्वारे वर्तनात होणारी सुधारणा होय. |
| ii) | वुडवर्थ | ब) | अध्ययन म्हणजे अनुभवाश्रित वर्तनबदल होय. |
| iii) | गेटस् | क) | अध्ययन म्हणजे अनुभव आणि वर्तन यांच्यामधील सुधारणा होय. |
| iv) | सिगोल | ड) | अध्ययन ही बदल घडवून आणणारी क्रिया आहे. |

(1) i – क, ii – ड, iii – अ, iv – ब
(2) i – अ, ii – ब, iii – क, iv – ड
(3) i – ड, ii – ब, iii – अ, iv – क
(4) i – ब, ii – अ, iii – क, iv – ड

**069.** अभिसंधान म्हणजे एखाद्या प्रक्रियेत नैसर्गिक चेतकाबरोबर कृत्रिम चेतक वापरून कृत्रिम चेतकाद्वारे तीच नैसर्गिक प्रतिक्रिया घडवून आणणे होय. त्यामुळे विद्यार्थ्यांना वळण लावणे शक्य होते. खालीलपैकी कोणती बाब अभिसंधानाचे उदाहरण नाही?

(1) अध्ययनार्थ्यांची वृत्ती बदलता येते.
(2) अध्ययनार्थ्यांना वाटणारी अकारण भीती अभिसंधानाने नष्ट करता येते.
(3) अध्ययनार्थ्याच्या चमत्कारिक वर्तनात बदल करणे अभिसंधानाने अशक्य असते.
(4) अध्ययनार्थ्यांना योग्य सवयी लावता येतात.

**070.** प्रत्येक बालक हे वेगळे असून, ते निसर्गाचे एकमेव व अद्वितीय निर्मिती असते. त्यानुसार भावंडामध्ये सामाजिक, मानसिक, भावनिक व शारीरिक भेद खालीलपैकी अनुवंशाच्या कोणत्या नियमानुसार दिसून येतात?

(1) साधर्म्याचा नियम
(2) विविधतेचा नियम
(3) परागमनाचा नियम
(4) पुनरावृत्तीचा नियम

**071.** मानवी प्राण्याची घडण अनुवंश व परिस्थिती यांच्या संयुक्त कार्यामुळेच होत असते. खाली दिलेल्या घटकांमध्ये कोणत्या घटकावर फक्त परिस्थितीचा प्रभाव दिसून येतो?

(1) स्वभाव व वृत्ती
(2) पक्वतेचे वय
(3) बुद्धिमत्ता
(4) डोळ्यांचा व शरीराचा रंग

**072.** केवळ ज्ञानेंद्रिय उद्दिपीत होऊन जी प्राथमिक स्वरुपाची मानसिक प्रक्रिया होते ती संवेदना होय. खाली दिलेल्या विधानांमध्ये संवेदनेविषयी कोणते विधान योग्य आहे?

(1) संवेदना ही फक्त आंतरिक प्रक्रिया आहे.
(2) आपली इच्छा असेल तरच संवेदना होते.
(3) संवेदनेच्या बाबतीत व्यक्ती ही सक्रिय असते.
(4) संवेदन प्रक्रिया मनाचा एक अकरणरुप व्यापार आहे.

**073.** हरवलेले नाणे शोधतांना कागदाचा पांढरा वर्तुळाकार तुकडा ते नाणे असल्याचा भास होतो, चांदण्या रात्री दूर एखादे झुडुप पाहून मनुष्य वा एखादा प्राणी असल्याचा भास होतो. हे खालीलपैकी अवबोधाच्या कोणत्या इंद्रियभ्रम दोषामुळे होते?

(1) परिचितता
(2) भौमितिक इंद्रियभ्रम
(3) विशिष्ट मन:स्थिति
(4) विशिष्ट भौतिक परिस्थिती

**074.** ज्ञानेंद्रिय उद्दिपीत न होता एखाद्या पुर्वानुभवाचे पुनरुज्जीवन होणे म्हणजे प्रतिमा होय. खाली दिलेल्या विधानांमध्ये कोणते विधान प्रतिमेचे वैशिष्ट्य आहे?

(1) प्रतिमा स्थिर असतात.
(2) प्रतिमांची तीव्रता सर्वांमध्ये सारखीच असते.
(3) पूर्वानुभवाशिवाय प्रतिमा तयार होत नाही.
(4) सर्व प्रतिमा सारख्याच तीव्रतेने निर्माण होतात.


Teachingninja.in

075. अध्ययनार्थ्यांना कल्पनाविष्काराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी शिक्षकाने खालीलपैकी कोणते उपक्रम राबवावे?

अ) दिवाळीच्या वेळी किल्ले तयार करुन घ्यावे.

ब) खेळाच्या माध्यमातून कल्पना विकसित करण्याचा प्रयत्न करावा.

क) वाद्यवादन करून घ्यावे.

ड) प्रदर्शन मांडणी करुन घ्यावी.

(1) अ, ब, क फक्त (2) अ, क, ड फक्त
(3) अ, ब, ड फक्त (4) अ, ब, क, ड सर्व

076. मन यांच्या मते पुर्वानुभवाच्या विविध अंगांची मनातल्या मनात जुळवाजुळव करणे म्हणजे ........ होय.

(1) स्मरण (2) बुद्धी (3) विचार (4) प्रेरणा

077. दोन घटना एकामागोमाग घडल्या तर त्यामध्ये कार्यकारण संबंध जोडण्याचा प्रयत्न केला जातो. उदा. परीक्षेला जातांना मांजर आडवे जाणे हे परीक्षेत नापास होण्याचे कारण ठरवले जाते. हे खालीलपैकी विचार प्रक्रियेतील कोणत्या अडथळ्यामुळे होते.

(1) प्रतिकूल ग्रह (2) काकतालीय न्याय (3) इच्छानुगामी विचार (4) निरीक्षणातील दोष

078. धारणेबाबत खालीलपैकी कोणते वैशिष्ट्य योग्य आहे?

(1) पाठोपाठ कविता पाठ केल्यास धारणेवर परिणाम होत नाही.

(2) धारणा बोधावस्थेत असेल तर आपल्याला चटकन आठवते.

(3) धारणा उपबोधावस्थेत असेल तर आपल्याला चटकन आठवते.

(4) अबोधावस्थेतील बाबी प्रयत्न केल्यावर आठवतात.

079. विस्मरणाबद्दलचे खालीलपैकी कोणते वैशिष्ट्य अयोग्य आहे?

(1) विस्मरण ही महत्वाची प्रक्रिया आहे.

(2) स्मरण चांगले राहण्यासाठी बऱ्याच गोष्टी विसरल्या पाहिजेत.

(3) धारणा जितकी कमी तितके विस्मरण कमी.

(4) धारणा जितकी जास्त तितके विस्मरण कमी.

080. आंतरिक प्रेरणेबाबत खालीलपैकी कोणते विधान अयोग्य आहे?

(1) विषयाची आवड ही आंतरिक प्रेरणा आहे.

(2) आंतरिक प्रेरणा व अभिरूची यांचा निकटचा संबंध आहे.

(3) प्रोत्साहके आंतरिक प्रेरणा आहेत.

(4) अभिरूची हा आंतरिक प्रेरणेचा पाया आहे.

081. स्पिअरमन यांच्या बुद्धिमत्तेच्या द्विघटक उपपत्तीमध्ये जे सामान्य व विशिष्ट घटक आहेत त्यासंबंधी खाली दिलेल्या विधानांपैकी कोणते विधान योग्य आहे?

(1) प्रत्येक व्यक्तीमध्ये सामान्य घटक मोठा असतो.

(2) प्रत्येक व्यक्तीमध्ये विशेष घटक मोठा असतो.

(3) क्षमतांना विकासपूरक असा सामान्य घटक असतो.

(4) विशेष घटक सर्व कार्यात व्यक्तीला उपयुक्त असतो.

082. "स्वतःच्या व इतरांच्या भावभावनांवर नियंत्रण ठेवणे व नियमन करण्याची क्षमता, विचार व कृती यांच्या मार्गदर्शनासाठी भावनांचा उपयोग करण्याची क्षमता म्हणजे भावनिक बुद्धिमत्ता होय." ही व्याख्या खालीलपैकी कोणत्या मानसशास्त्रज्ञाने दिली?

(1) आल्फ्रेड बीने (2) डेव्हीड वेश्लर (3) पीटर सॅलोव्ही (4) हॉवर्ड गार्डनर



Teachingninja.in

083. लेवीनने मांडलेले मानसिक संघर्षाचे प्रकार व त्यांची उदाहरणे खाली दिली आहेत. त्यांच्या योग्य जोड्यांचा बरोबर पर्याय कोणता?

| | उदाहरण | | संघर्षाचा प्रकार |
|---|---|---|---|
| i) | खिशात सिनेमापुरते पैसे आहेत पण मित्रांना पार्टी द्यावीशी वाटते, परंतु सिनेमा पाहण्याची इच्छा सोडवत नाही. | अ) | हवे-नको संघर्ष |
| ii) | परीक्षेसाठी अभ्यासाचे कष्ट नको असतात व नापास होणेही नको असते. | ब) | हवे-हवे संघर्ष |
| iii) | आवडता पदार्थ खावा वाटतो पण पोटात जागा नसल्यामुळे नको वाटतो. | क) | नको-नको संघर्ष |

(1) i – अ ii – ब iii – क
(2) i – ब ii – क iii – अ
(3) i – क ii – ब iii – अ
(4) i – ब ii – अ iii – क

084. परीक्षेत साधे यश मिळाल्यास "मी मुळीच अभ्यास केला नव्हता, तरी मला इतके गुण मिळाले" असे सांगत सुटणे म्हणजे ................. संरक्षण यंत्रणेचा वापर करणे.
(1) तादात्म्य (2) नकारात्मकता (3) प्रतिपूरण (4) कृतकसमर्थन

085. दोन अध्ययन पद्धतींमध्ये नुसते समान घटक संक्रमण करतात पण त्याहीपेक्षा अधिक स्पष्ट निश्चित स्वरुपाचे अध्ययन संक्रमण त्या दोन घटकांचे सामान्यीकरण केले तर घडते. ही सामान्यीकरण अध्ययन संक्रमण उपपत्ती खालीलपैकी कोणत्या मानसशास्त्रज्ञाने मांडली?
(1) पॅव्हलॉव्ह (2) बॅग्ले (3) जडड् (4) थॉर्नडाईक

086. शैशवावस्थेमध्ये ज्यायोगे बालक विचाराच्या व आकलनाच्या वर्तमान रचनेमध्ये नवीन घटक किंवा अनुभव समाविष्ट करुन घेते व ज्यावेळी वर्तमान विचारपध्दतीनुसार एखाद्या उद्दिपकाचे किंवा घटनेचे संवेदन आकलन केले जाते किंवा त्याला प्रतिक्रिया केली जाते तेव्हा .......... क्रिया घडते.
(1) अभिमुखीकरण (2) आत्मसातीकरण (3) संधारण (4) समावेशन

087. किशोरावस्थेतील बालकांच्या भावनिक विकासाबाबत खालीलपैकी कोणती बाब योग्य आहे?
(1) अर्थ समजूनच पाठांतर करतात.
(2) या वयातील मुलांची अवधानकक्षा अमर्यादित असते.
(3) नीती-अनीतीची जाणीव असते.
(4) पाठ केलेले सहसा विसरत नाहीत.

088. मंदगतीने अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत खालीलपैकी कोणती बाब अयोग्य आहे?
(1) या विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता सामान्य असते.
(2) हे मंदबुद्धी विद्यार्थी असतात.
(3) सर्वसामान्यांच्या तुलनेने अभ्यासात मागे पडतात.
(4) या विद्यार्थ्यांसाठी नैदानिक चाचणी आवश्यक असते.

089. "व्यक्तिमत्त्व म्हणजे स्वत:च्या परिसराशी व्यक्तीचे जे वैशिष्ट्यपूर्ण समायोजन होत असते त्याला कारणीभूत असणारी व वर्तनाला चालना देणारी शारीरिक आणि मानसिक यंत्रणेची गतिशील संघटना होय." अशी व्यक्तिमत्त्वाची व्याख्या खालीलपैकी कोणत्या मानसशास्त्रज्ञाने दिली?
(1) नॉर्मन एल मन
(2) जी डब्ल्यू ऑलपोर्ट
(3) जी ए. किंबल
(4) जे. बी. वॅटसन

090. वृकस्थ ग्रंथीतून पाझरणाऱ्या ॲड्रेनलिन या स्त्रावाचे प्रमाण कमी झाल्यास खालीलपैकी कोणता परिणाम दिसून येतो?
(1) पौरूषत्त्व दिसून येते.
(2) स्वास्थ्य जाणवते.
(3) व्यक्ती अशक्त दिसते.
(4) व्यक्ती स्थिर वृत्तीची दिसते.




Teachingninja.in

# गणित

091. तीन पेट्यांमध्ये अनुक्रमे 216, 126 व 162 वह्या आहेत. त्या पेट्यांतील वह्यांचे समान वह्या असलेले गठ्ठे करायचे असल्यास प्रत्येक गठ्ठयात जास्तीत जास्त किती वह्या घ्याव्यात?
(1) 6 (2) 9 (3) 36 (4) 18

092. 49.247 या संख्येतील उजवीकडील चारची स्थानिक किंमत डावीकडील चारच्या स्थानिक किंमतीच्या किती पट आहे?
(1) $10^2$ (2) $10^{-2}$ (3) $10^3$ (4) $10^{-3}$

093. शेजारील समभुज चौकोनातील
$n°$ = किती?
(1) 70° (2) 80°
(3) 60° (4) 90°




094. 9 सेमी × 40 सेमी आयताकृती रंगीत कागदाच्या दोन्ही कर्णांवर कापून चार पताका तयार केल्यात; तर दोन मोठ्या पताकांची एकूण परिमिती किती सेमी असेल?
(1) 262 सेमी (2) 180 सेमी (3) 162 सेमी (4) 81 सेमी

095. $\left[\frac{(x^2-9x+20)}{(x-5)}\right]$ = 0 असेल ; तर $x$ = किती?
(1) 4 (2) -4 (3) 5 (4) -5


096. फक्त काही 500 रुपये किंमतीच्या व काही 2000 रूपये किंमतीच्या नोटा असलेल्या पिशवीत 30500 रुपये आहेत; तर त्या पिशवीत खालील पर्यायांपैकी 500 रुपये किंमतीच्या किती नोटा असू शकतील?
(1) 23 (2) 39 (3) 43 (4) 49

097. एका कोनाचा पूरककोन आणि कोटिकोन यांच्या मापांची बेरीज 200° आहे. तर त्या कोनाचे माप किती?
(1) 35° (2) 45° (3) 55° (4) 65°



Teachingninja.in

प्र. 098 व 099 सूचना: आलेखाचे निरीक्षण करून सोडवा.




**098.** ऑक्टोबर महिन्याची विद्यार्थी उपस्थिती ऑगस्ट महिन्याच्या उपस्थितीच्या शे. कितीने जास्त आहे?

(1) $11\frac{1}{9}$ (2) 10 (3) $12\frac{1}{2}$ (4) $88\frac{8}{9}$

**099.** किती महिन्यात विद्यार्थ्यांची शे. उपस्थिती पाच महिन्यांतील शे. सरासरी उपस्थितीपेक्षा कमी आहे?

(1) एक (2) दोन (3) तीन (4) चार



Teachingninja.in

**100.** 10 या त्रिकोणी संख्येनंतर क्रमाने येणाऱ्या आठव्या त्रिकोणी संख्येचा पाया किती?

(1) 14 (2) 13 (3) 12 (4) 11

**101.** एक काम काही मजूर काही दिवसात पूर्ण करतात. जर मजूरांची संख्या $\frac{2}{3}$ पट केली; तर तेच काम पूर्ण करण्यास दिवसांची संख्या पूर्वीच्या संख्येच्या किती पट होईल?

(1) सव्वा पट (2) $\frac{3}{4}$ पट (3) दीडपट (4) $\frac{2}{3}$ पट

**102.** रोमन संख्यांच्या संदर्भाने विसंगत पर्याय कोणता?

(1) M भागिले C (2) *xx*V गुणिले IV (3) *xc* अधिक *x* (4) D वजा CD

**103.** मिनिट काटा बारावर असतांना वेळ पाहिली, तेव्हा तासकाटा व मिनिटकाटा यांच्यात काटकोन तयार झालेला दिसला. तर आणखी दीड तासांनी त्या दोन्ही काट्यात किती अंशाचा कोन होईल?

(1) 40° (2) 45° (3) 150° (4) 165°

**104.** खालील आकृतीबंधात '☐' च्या जागी असणारी संख्या कोणती?

15, 26, 35, 50, 63, ☐, 99

(1) 80 (2) 81 (3) 82 (4) 83

**105.** 88 सेमी परिघ असणाऱ्या वर्तुळावरील कोणतेही चार बिंदु परस्परांशी जोडून तयार झालेल्या चौरसाकृतीची बाजू किती सेमी असेल?

(1) $14\sqrt{2}$ (2) 14 (3) $7\sqrt{2}$ (4) 7

**106.** प्रत्येकी 1.75 मी. समान मापाचे तुकडे करण्यासाठी सव्वा एकोणवीस मी. लांबीच्या दोरीची दोन्ही टोके जुळविली; तर त्या दुपदरी दोरीला किती ठिकाणी कापावे लागेल?

(1) 6 (2) 5 (3) 10 (4) 11

**107.** एका संख्येस 15, 11 आणि 12 यांनी भागले असता, प्रत्येक वेळी बाकी 4 उरते. तर ती संख्या खालील पर्यायांपैकी कोणती असू शकेल?

(1) 660 (2) 1984 (3) 1316 (4) 2636

**108.** $\left[\frac{(6.5-3.3-2.5)(2.25+0.25+3.2)}{(1.8+1.4)(6.5-3.3)-(2.25+0.25)(4.25-1.75)}\right]$ = किती ?

(1) 1 (2) 0 (3) 2.5 (4) 3.2

**109.** एका वर्तुळाकृती बागेमध्ये असणाऱ्या आयताकृती मैदानाची लांबी 56 मी. व रुंदी 42 मी. आहे. जर मैदानाचे चारही शिरोबिंदू वर्तुळाकृती जागेच्या परिघावर असतील; तर मैदान वगळता उर्वरित बागेचे क्षेत्रफळ किती चौ. मी. असेल?

(1) 2135 (2) 3850 (3) 2352 (4) 1498

**110.** सविताचे मासिक वेतन रु. 10000 असून ते वेदिकाच्या मासिक वेतनाच्या सव्वापट आहे. वेदिकाच्या मासिक वेतनाची रक्कम आसियाच्या मासिक वेतनाच्या दुप्पट असेल; तर सविता व आसिया यांच्या मासिक वेतनातील फरक किती रुपये आहे?

(1) रु. 6000 (2) रु. 4000 (3) रु. 3750 (4) रु. 2000



Teachingninja.in


**111.** काही मुलांना प्रत्येकी 18 वह्या वाटायचे ठरले. परंतु प्रत्यक्षात प्रत्येकी 24 वह्या वाटल्या; तेव्हा 150 वह्या कमी पडल्या; तर त्या मुलांची संख्या किती असेल?

(1) 18 (2) 28 (3) 22 (4) 25

**112.** शेजारील आकृतीतील चौकोनांची संख्या किती?

(1) 6 (2) 8

(3) 10 (4) 12



**113.** 56 वस्तू समान वाटायच्या असतील; तर किती प्रकारे वाटता येतील?

(1) 10 (2) 8 (3) 6 (4) 4

**114.** दोन अंकी सम संख्यांची बेरीज किती?

(1) 2500 (2) 2475 (3) 2530 (4) 2430

**115.** (9 व 49), (11 व 111), (19 व 247), (21 व 85) आणि (12 व 33) यांपैकी सहमूळ संख्यांच्या जोड्या किती?

(1) पाच (2) दोन (3) तीन (4) चार

**116.** एके वर्षी महाराष्ट्र दिन शुक्रवारी आहे. तर त्याच वर्षी शिक्षक दिन कोणत्या वारी असेल?

(1) बुधवार (2) शुक्रवार (3) गुरुवार (4) शनिवार

**117.** विशिष्ट रक्कमेच्या $\frac{7}{18}$ पट रक्कम वेदला किंवा $\frac{2}{5}$ पट रक्कम आलोकला किंवा $\frac{3}{8}$ पट रक्कम सानियाला किंवा $\frac{6}{11}$ पट रक्कम वीणाला दिली असेल; तर सर्वात कमी रक्कम कोणाला मिळेल?

(1) वेद (2) आलोक (3) सानिया (4) वीणा

**118.** 'आयत हा …….. असतो.' हे विधान पूर्ण करण्यासाठी योग्य असणाऱ्या बाबी खालीलपैकी कोणत्या?

अ) समांतरभुज चौकोन

ब) काटकोन चौकोन

क) समभुज चौकोन

(1) फक्त 'अ' आणि 'ब' (2) फक्त 'ब' आणि 'क'

(3) फक्त 'अ' आणि 'क' (4) तिन्ही 'अ', 'ब' आणि 'क'


**119.** $\left[1\frac{1}{2}+\left(\frac{5}{8}-\frac{1}{4}\right)\times 0.24\right]$ = किती?

(1) $5\frac{2}{5}$ (2) 1.59 (3) $15\frac{9}{10}$ (4) 0.54

**120.** शेजारील घडणीवरून तयार होणाऱ्या इष्टिकाचिती आकाराच्या पेटीच्या 'A' च्या विरुद्ध पृष्ठावर कोणते अक्षर असेल?

(1) E (2) F

(3) C (4) D






Teachingninja.in

121. 'मैदान' या नावाने ओळखला जाणारा प्रदेश कोणता?
(1) छत्तीसगड राज्याचा दक्षिण भाग आणि ओडिशा राज्याचा नैऋत्य भाग
(2) छत्तीसगड राज्याचा मध्यभाग आणि ओडिशा राज्याचा पश्चिम भाग
(3) पूर्वेचे पठार
(4) कर्नाटकचे पठार

122. 'सखोल शेती' या शेती प्रकाराशी संबंधित बाबी खालीलपैकी कोणत्या?
अ) एकाच प्रकारचे मोठ्या प्रमाणावर विस्तीर्ण क्षेत्रात घेतले जाणारे पीक
ब) मनुष्य व पशुबळाचा जास्तीत जास्त वापर
क) मर्यादित यांत्रिकीकरण
(1) फक्त 'अ' आणि 'ब' (2) फक्त 'ब' आणि 'क'
(3) फक्त 'अ' आणि 'क' (4) तिन्ही 'अ' 'ब' आणि क

123. गुजरातच्या सीमेशी लागून (संलग्न) महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा गट कोणता?
(1) नंदुरबार-धुळे (2) जळगाव-नाशिक (3) ठाणे-पालघर (4) ठाणे-मुंबई

124. सर्वसाधारणपणे 'मासे' (मत्स्यवर्ग) यांच्याशी विसंगत बाब खालील पर्यायांपैकी कोणती?
(1) काही मासे दीर्घायू असतात.
(2) काही मासे अल्पायुषी असतात.
(3) हृदय तीन कप्प्यांनी बनलेले असते.
(4) शरीराचे तापमान आजूबाजूच्या तापमानानुसार बदलते.

125. संपर्कजन्य रोगांचा गट खालील पर्यायांपैकी कोणता?
(1) ॲनिमिया, स्कर्व्ही, गजकर्ण (2) नायटा, इसब, युरेमिया
(3) खरूज, नायटा, गलगंड (4) खरूज, इसब, गजकर्ण

126. मेलेल्या जनावरांच्या हाडांपासून 'बोनमील' या नावाने प्रचलित काय आहे?
(1) खत (2) जिलेटीन (3) कीटकनाशके (4) औषध

127. प्रामुख्याने मानवी शरीराच्या बांधणीस आवश्यक असणारी पोषकद्रव्ये कोणत्या घटकापासून मिळतात?
(1) पिष्टमय पदार्थ (2) मेद (3) जीवनसत्त्वे (4) प्रथिने

128. शरीरावरील जखमेच्या जागी होणारा रक्तस्त्राव गोठविण्याचे कार्य कोण करते?
(1) रक्तकेशिका (2) रक्तबिंबीका (3) रक्तलसिका (4) रक्तग्रासिका

129. पृथ्वीवरून 'आकाश निळ्या रंगाचे दिसते' याला कारणीभूत ठरणारा/ठरणारे घटक खालीलपैकी कोणता/कोणते
अ) वातावरण
ब) प्रकाशाचे विकिरण
(1) फक्त 'अ' (2) फक्त 'ब'
(3) दोन्ही 'अ' आणि 'ब' (4) 'अ' आणि 'ब' दोन्ही नाही.



Teachingninja.in

130. सर्वसाधारणपणे धातू ................ नसतात.
(1) तन्य (2) वर्धनीय (3) ठिसूळ (4) सुवाहक

131. खालील 'कारण' व 'परिणाम' यांचा अर्थ लक्षात घेऊन योग्य पर्याय निवडा.
कारण: अ) पाणी हे संयुग आहे.
परिणाम: ब) पाण्याचे गुणधर्म हे हायड्रोजन व ऑक्सीजन यांच्या गुणधर्मापेक्षा भिन्न आहेत.
(1) फक्त 'अ' योग्य (2) फक्त 'ब' योग्य
(3) दोन्ही 'अ' आणि 'ब' योग्य (4) 'अ' आणि 'ब' दोन्ही अयोग्य

132. परिसंस्थेतील 'विघटक' हा घटक अन्नसाखळीमध्ये कोणती क्रिया करण्याचे काम करतात?
(1) सात्मीकरण (2) संक्रमण (3) उत्सर्जन (4) रसाकर्षण

133. भारताच्या संदर्भाने प्राचीन इतिहासाचा कालखंड कोणता?
(1) इसवी सन पूर्व आठव्या शतकापासून इसवी सनाच्या दहाव्या शतकापर्यंत
(2) अश्मयुगीन काळापासून इसवी सनाच्या आठव्या शतकापर्यंत
(3) अश्मयुगीन काळापासून इसवी सनाच्या दहाव्या शतकापर्यंत
(4) इसवी सन पूर्व आठव्या शतकापासून ते इसवी सनाच्या आठव्या शतकापर्यंत

134. खालीलपैकी योग्य विधाने कोणती?
अ) हडप्पा संस्कृतीला सिंधू संस्कृती असेही म्हणतात.
ब) हडप्पा व मोहेनजोदडो या दोन्ही ठिकाणांच्या अवशेषांमध्ये समान वैशिष्ट्ये दिसून आली.
क) हडप्पा व मोहेनजोदडो ही दोन्ही शहरे आज पाकिस्तानात आहेत.
(1) फक्त 'अ' आणि 'ब' (2) फक्त 'ब' आणि 'क'
(3) फक्त 'क' आणि 'अ' (4) तिन्ही 'अ', 'ब' आणि 'क'

135. मानवी उत्क्रांन्तीच्या टप्प्यातील 'बुद्धिमान मानव' कोणत्या नावाने ओळखला जातो?
(1) होमो हॅबिलिस (2) होमो इरेक्टस (3) निअँडरथल मॅन (4) क्रोमॅनॉन मॅन

136. शिवकाळात हिंदवी स्वराज्याचा/साम्राज्याचा भाग नसलेला प्रदेश/ठिकाण दर्शविणारा पर्याय कोणता?
(1) कर्नाटकातील बेळगाव (2) कारवार व धारवाड
(3) तामीळनाडूतील वेल्लोर (4) म्हैसूर व मदुराई

137. 'छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या सहकाऱ्यांना उद्देशून बोलत आहेत.' असा प्रसंग कल्पून कोणी काव्यरचना केली आहे?
(1) महात्मा जोतिबा फुले (2) सुब्रमण्यम भारती
(3) रविंद्रनाथ टागोर (4) सरोजिनी नायडू

138. मध्ययुगीन भारताचे पहिले आरमारदल कोणत्या शतकात उभारले गेले?
(1) पंधरावे (2) सोळावे (3) सतरावे (4) अठरावे

139. छत्रपती शिवाजी महाराज: शिवनेरी :: समर्थ रामदास :?
(1) सज्जनगड (2) जांब (3) चाफळ (4) शिवथरघळ


Teachingninja.in

140. 'शिवराय आपल्या सेवकांची/सहकाऱ्यांची पित्यासारखी काळजी घेत'. या वाक्याशी संबंधित स्पष्टीकरण देतांना विद्यार्थ्यांना शिक्षक कोणाचा दाखला देणार नाहीत?
(1) मदारी मेहत्तर (2) कान्होजी जेधे (3) प्रतापराव गुजर (4) बाजी घोरपडे

141. शिवरायांच्या काळात 'बारगीर' हे संबोधन/पद कोणत्या सैन्यदलाशी संबंधित आहे?
(1) घोडदळ (2) पायदळ (3) आरमारदल (4) हेरखाते

142. भारतीय संविधानानुसार खालील पर्यायांपैकी कोणता मुलभूत अधिकार नाही?
(1) धर्मस्वातंत्र्याचा अधिकार (2) शैक्षणिक व सांस्कृतिक अधिकार
(3) मतदानाचा अधिकार (4) घटनात्मक उपाययोजनांचा अधिकार

143. किमान 15 व कमाल 45 सदस्यसंख्या कोणत्या स्थानिक शासन संस्थेत असते?
(1) नगरपंचायत (2) पंचायत समिती (3) नगरपरिषद (4) ग्रामपंचायत

144. खालील पर्यायातील राज्यपालांशी संबंधित विसंगत बाब कोणती?
(1) राज्याचे घटनात्मक प्रमुख असतात.
(2) राज्याचे कार्यकारी प्रमुख नसतात.
(3) राज्याबाहेरील व्यक्ती असतात.
(4) राज्यातील कार्यकारी मंडळात समावेश नसतो.

145. तंतुमय पदार्थ नसणारा पर्याय कोणता?
(1) बाजरी (2) पालेभाज्या (3) धान्याचा कोंडा (4) मार्गारिन

146. 'पेंच नवेगाव व चांदोली' हा गट प्रामुख्याने कशाशी संबंधित आहे?
(1) शरणवणे (2) अभयारण्ये (3) राष्ट्रीय उद्याने (4) जैवविविधता उद्याने

147. महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वतीय प्रदेशात आढळणाऱ्या प्रमुख आदिवासी जमाती कोणत्या?
(1) कोरकु-वारली (2) वारली-कोकणा (3) कोकणा-भिल्ल (4) भिल्ल-कोरकु

148. 'काळी मृदा' या प्रकारच्या मृदेचे वैशिष्ट्य/गुणधर्म नसणारे विधान खालील पर्यायांपैकी कोणते?
(1) बेसॉल्ट खडकांचा अपक्षय होऊन या मृदेची निर्मिती होते.
(2) टिटॅनिफेरस, मॅग्नेटाईट या घटकद्रव्यांमुळे काळा रंग प्राप्त होतो.
(3) पाणी धरून ठेवण्याची क्षमता जास्त असते.
(4) या मृदेला 'रेगूर' किंवा 'गाळाची मृदा' असेही म्हणतात.

149. महाराष्ट्रातील जलसिंचन क्षेत्राचा विचार करता सर्वसामान्यपणे जलसिंचन साधनांच्या वापरानुरूप सर्वात जास्त व सर्वात कमी अशी जोडी दर्शविणारा पर्याय कोणता?
(1) कालवा-उपसा (2) कालवा-तलाव (3) विहीर-उपसा (4) विहीर-तलाव

150. खालील पर्यायांपैकी रेखावृत्ताचे वैशिष्ट्य कोणते?
(1) परस्परांशी समांतर (2) लांबी समान
(3) मूळ रेखावृत्त म्हणजे बृहतवृत्त (4) 0° रेखावृत्त म्हणजे विषुववृत्त


Teachingninja.in

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२१

## परीक्षा दिनांक २१ नोव्हेंबर २०२१

**पेपर - १ (१ ली ते ५ वी शिक्षकांकरिता)** **माध्यम:- मराठी**

**अंतरिम उत्तरसूची - दिनांक : ०२ / १२ /२०२१**

| मराठी | | | | | इंग्रजी | | | | | बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रश्न क्रमांक | पर्याय क्रमांक संचकोड | | | | प्रश्न क्रमांक | पर्याय क्रमांक संचकोड | | | | प्रश्न क्रमांक | पर्याय क्रमांक संचकोड | | | |
| | A | B | C | D | | A | B | C | D | | A | B | C | D |
| १ | २ | ४ | ३ | ३ | ३१ | ४ | ३ | २ | २ | ६१ | २ | २ | ४ | २ |
| २ | १ | २ | १ | २ | ३२ | १ | २ | ४ | ३ | ६२ | १ | ४ | ३ | १ |
| ३ | ३ | २ | ४ | ३ | ३३ | ४ | १ | १ | २ | ६३ | ४ | २ | २ | ४ |
| ४ | ३ | १ | १ | २ | ३४ | २ | ४ | ४ | ४ | ६४ | ३ | २ | २ | १ |
| ५ | २ | ३ | ३ | २ | ३५ | ३ | १ | २ | १ | ६५ | ३ | ३ | ३ | ३ |
| ६ | २ | २ | २ | ४ | ३६ | २ | ३ | ४ | ३ | ६६ | ४ | २ | ३ | ४ |
| ७ | ३ | ३ | १ | २ | ३७ | ४ | २ | १ | ३ | ६७ | ३ | १ | १ | २ |
| ८ | १ | २ | २ | १ | ३८ | १ | ३ | ३ | २ | ६८ | २ | ४ | ३ | १ |
| ९ | ४ | २ | ४ | १ | ३९ | ४ | २ | ४ | २ | ६९ | २ | १ | २ | ३ |
| १० | १ | ४ | २ | ३ | ४० | २ | ४ | १ | ३ | ७० | ३ | ३ | ४ | २ |
| ११ | ३ | २ | २ | १ | ४१ | ४ | १ | ४ | ३ | ७१ | ३ | ४ | ३ | १ |
| १२ | २ | १ | १ | १ | ४२ | १ | ३ | १ | ४ | ७२ | १ | २ | २ | ४ |
| १३ | १ | १ | ३ | २ | ४३ | ३ | ३ | ३ | ४ | ७३ | ३ | १ | ४ | ३ |
| १४ | २ | ३ | २ | १ | ४४ | ४ | २ | २ | १ | ७४ | २ | ३ | २ | ३ |
| १५ | ४ | १ | ३ | ३ | ४५ | १ | २ | ३ | ४ | ७५ | ४ | २ | २ | ४ |
| १६ | २ | १ | २ | ३ | ४६ | ४ | ३ | २ | २ | ७६ | ३ | १ | ३ | ३ |
| १७ | २ | २ | २ | २ | ४७ | १ | ३ | ४ | ३ | ७७ | २ | ४ | २ | २ |
| १८ | १ | १ | ४ | २ | ४८ | ३ | ४ | १ | २ | ७८ | ४ | ३ | १ | २ |
| १९ | ३ | ३ | २ | ३ | ४९ | २ | ४ | ३ | ४ | ७९ | २ | ३ | ४ | ३ |
| २० | २ | ३ | १ | १ | ५० | ३ | १ | ३ | १ | ८० | २ | ४ | १ | ३ |
| २१ | ३ | २ | १ | ४ | ५१ | २ | ४ | १ | ४ | ८१ | ३ | ३ | ३ | १ |
| २२ | २ | २ | ३ | १ | ५२ | ४ | २ | २ | २ | ८२ | २ | २ | ४ | ३ |
| २३ | २ | ३ | १ | ३ | ५३ | १ | ३ | ३ | ४ | ८३ | १ | २ | २ | २ |
| २४ | ४ | १ | १ | २ | ५४ | ३ | २ | ३ | १ | ८४ | ४ | ३ | १ | ४ |
| २५ | २ | ४ | २ | १ | ५५ | ३ | ४ | ४ | ३ | ८५ | १ | ३ | ३ | ३ |
| २६ | १ | १ | १ | २ | ५६ | २ | १ | ४ | ४ | ८६ | ३ | १ | २ | २ |
| २७ | १ | ३ | ३ | ४ | ५७ | २ | ४ | १ | १ | ८७ | ४ | ३ | १ | ४ |
| २८ | ३ | २ | ३ | २ | ५८ | ३ | २ | ४ | ४ | ८८ | २ | २ | ४ | २ |
| २९ | १ | १ | २ | २ | ५९ | ३ | ४ | २ | १ | ८९ | १ | ४ | ३ | २ |
| ३० | १ | २ | २ | १ | ६० | ४ | १ | ३ | ३ | ९० | ३ | ३ | ३ | ३ |



Teachingninja.in

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२१

## परीक्षा दिनांक २१ नोव्हेंबर २०२१

### पेपर - १ (१ ली ते ५ वी शिक्षकांकरिता) माध्यम:- मराठी

### अंतरिम उत्तरसूची - दिनांक : ०२ / १२ /२०२१

| गणित | | | | | परिसर अभ्यास | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रश्न क्रमांक | पर्याय क्रमांक | | | | प्रश्न क्रमांक | पर्याय क्रमांक | | | |
| | संचकोड | | | | | संचकोड | | | |
| | A | B | C | D | | A | B | C | D |
| ९१ | ३ | ४ | १ | ४ | १२१ | २ | ४ | २ | ४ |
| ९२ | ३ | ३ | २ | ४ | १२२ | ४ | ३ | ४ | २ |
| ९३ | १ | १ | २ | १ | १२३ | ४ | २ | १ | १ |
| ९४ | २ | २ | १ | ३ | १२४ | ४ | ४ | ३ | ३ |
| ९५ | ३ | ३ | ४ | १ | १२५ | २ | २ | २ | ४ |
| ९६ | १ | ४ | १ | ४ | १२६ | ३ | १ | ४ | १ |
| ९७ | २ | ४ | ४ | १ | १२७ | २ | ३ | ४ | ४ |
| ९८ | २ | १ | २ | ३ | १२८ | ४ | ४ | ३ | २ |
| ९९ | १ | ३ | २ | २ | १२९ | १ | १ | २ | ३ |
| १०० | ४ | १ | ४ | ३ | १३० | ३ | ४ | ४ | ३ |
| १०१ | १ | ४ | ४ | ३ | १३१ | २ | २ | ३ | ३ |
| १०२ | ४ | १ | ४ | १ | १३२ | ४ | ३ | २ | २ |
| १०३ | २ | ३ | ३ | २ | १३३ | ४ | ३ | ४ | २ |
| १०४ | २ | २ | १ | ३ | १३४ | ३ | ३ | २ | ४ |
| १०५ | ४ | ३ | २ | १ | १३५ | २ | २ | १ | ४ |
| १०६ | ४ | ३ | ३ | २ | १३६ | ४ | २ | ३ | ४ |
| १०७ | ४ | १ | ४ | २ | १३७ | ३ | ४ | ४ | २ |
| १०८ | ३ | २ | ४ | १ | १३८ | २ | ४ | १ | ३ |
| १०९ | १ | ३ | १ | ४ | १३९ | ४ | ४ | ४ | २ |
| ११० | २ | १ | ३ | १ | १४० | २ | २ | २ | ४ |
| १११ | ३ | २ | १ | ४ | १४१ | १ | ३ | ३ | १ |
| ११२ | ४ | २ | ४ | २ | १४२ | ३ | २ | ३ | ३ |
| ११३ | ४ | १ | १ | २ | १४३ | ४ | ४ | ३ | २ |
| ११४ | १ | ४ | ३ | ४ | १४४ | १ | १ | २ | ४ |
| ११५ | ३ | १ | २ | ४ | १४५ | ४ | ३ | २ | ४ |
| ११६ | १ | ४ | ३ | ४ | १४६ | २ | २ | ४ | ३ |
| ११७ | ४ | २ | ३ | ३ | १४७ | ३ | ४ | ४ | २ |
| ११८ | १ | २ | १ | १ | १४८ | ३ | ४ | ४ | ४ |
| ११९ | ३ | ४ | २ | २ | १४९ | ३ | ३ | २ | ३ |
| १२० | २ | ४ | ३ | ३ | १५० | २ | २ | ३ | २ |

(तुकाराम सुपे)

आयुक्त,

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

Teachingninja.in